दैनिक संध्या
# इनसाइडर न्यूज टुडे
गुपीत उघड करणारी नजर, बातमी तुमची, जबाबदारी आमची
RNI. No : MHMUL/25/A0574
वर्ष : १ ■ अंक १२ ■ पृष्ठ ४ ■ मुल्य ५ रू
www.insidernewstoday.in facebook.com/newstoday24x7offical नागपूर, शुक्रवार ४ जुलै २०२५ insidernewstoday@gmail.com @insidenewstoday

## 'बाप बनण्याचा प्रयत्न करू नका!'

■ संदीप देशपांडेंचा व्यापाऱ्यांना इशारा

मुंबई : एका अमराठी व्यापाऱ्याला मराठी न बोलल्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याची घटना उफाळून आली आहे. यानंतर व्यापारी संघटनांनी मनसेच्या विरोधात मोर्चा काढत निषेध व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी व्यापाऱ्यांना थेट इशारा देत वाद अधिक चिघळला आहे. "व्यापाऱ्यांनी आमचा बाप बनण्याचा प्रयत्न करू नये," असा रोखठोक संदेश देत देशपांडेंनी मनसेच्या भूमिकेचे समर्थन केले. मराठी भाषेच्या सन्मानासाठी मनसेने नेहमीप्रमाणे ठाम भूमिका घेतली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.संपूर्ण प्रकारात भाजपच्या हस्तक्षेपाचा आरोपही समोर येत आहे. व्यापाऱ्यांच्या मोर्चामागे भाजपचा पाठिंबा असल्याचे सांगण्यात येते. गुरुवारी मीरा-भाईंदरमध्ये व्यापारी संघटनांनी मनसेच्या विरोधात निषेध मोर्चा काढला होता.

# ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## राहुल गांधींचा संतप्त सवाल | विधानसभेतही विरोधक आक्रमक

मुंबई , प्रतिनिधी ता. ४ : राज्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसताना अवघ्या तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी गळफास घेतल्याचा गंभीर खुलासा झाला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर आणि राज्यातील महायुती सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. महाराष्ट्रात केवळ तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. ही आकडेवारी नाही, ही ७६७ उद्ध्वस्त कुटुंबं आहेत. अशी कुटुंबं जी कधीच सावरू शकणार नाहीत. आणि सरकार? ते शांत आहे, गप्प बसून फक्त पाहतंय." या पार्श्वभूमीवर विरोधकांनी सभागृहातून दोनदा बहिर्गमन करत सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदवला.

■ शेतकऱ्यांचे जीवन अर्धवट होत आहे : राहुल गांधी



राहुल गांधी पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांना दररोज वाढत्या कर्जाचा सामना करावा लागत आहे. बियाणे, खते, डिझेल यांचे दर गगनाला भिडले असतानाही सरकारकडून हमीभावाची हमी नाही. जेव्हा शेतकरी कर्जमाफीसाठी आवाज उठवतात, तेव्हा त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जाते. "मोदी सरकार कोट्यधीश उद्योजकांचे कर्ज सहज माफ करतं, पण गरीब शेतकऱ्यांसाठी काहीच करत नाही. आज बातम्यांमध्ये अनिल अंबानींच्या ४८ हजार कोटींच्या एसबीआय घोटाळ्याचं उदाहरण समोर आलं आहे," असा आरोपही त्यांनी यावेळी केला. "पंतप्रधान मोदी म्हणाले होते की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू. पण आज शेतकऱ्यांचं आयुष्यच अर्धं होत आहे. ही व्यवस्था त्यांना हळूहळू संपवत आहे आणि मोदी मात्र फक्त जनसंपर्काचा तमाशा पाहत आहेत."राज्य विधानसभेतही बुधवारी शेतकरी आत्महत्यांबाबत व सोयाबीन शेतकऱ्यांना थकबाकी मिळालेली नाही या मुद्द्यांवरून प्रचंड गोंधळ आणि दोन वेळा सभात्याग पाहायला मिळाला.

**काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत पुढील दिली माहिती**

- ■ जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत ७६७ आत्महत्या
- ■ यातील २०० प्रकरणे शासनाने मदतीसाठी अपात्र
- ■ तर १९४ प्रकरणांची चौकशी अद्याप प्रलंबित

## समृद्धी महामार्गावर अपघातांचा काळ: भीषण दुर्घटना, २ मृत, ३ गंभीर जखमी

### कारचे नियंत्रण सुटल्याने वाहन थेट डिव्हायडरवर आदळले

वाशिम, प्रतिनिधी ता. ४ : समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. वाशिम जिल्ह्यातील वनोजा ते कारंजा दरम्यान चॅनल क्रमांक २१५ नागपूर कॉरिडॉरवर कारचा अपघात झाला. या अपघातात वैदीही जयस्वाल आणि माधुरी जयस्वाल या दोघांचा जागीच मृत्यू झाला असून चेतन जयस्वाल, राधेश्याम जयस्वाल आणि संगीता जयस्वाल हे गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातग्रस्त कुटुंब पुण्याहून उमरेड (नागपूर) येथे जात होते. कारचे नियंत्रण सुटल्याने वाहन थेट डिव्हायडरवर आदळले आणि मोठा अपघात घडला. जखमींना वाशिम येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.या घटनेनं पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याआधीदेखील अशाच प्रकारच्या अपघातांत अनेकांनी आपले प्राण गमावले आहेत. गेल्या आठवड्यात नाशिकचे प्रसिद्ध उद्योजक सुनील हेकरे यांचा मर्सिडीज कार अपघातात मृत्यू झाला होता. त्यांच्या पत्नीसह दोन मुले गंभीर जखमी झाली होती. तातडीची वैद्यकीय मदत वेळेत न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी



केला होता.तसेच, काही दिवसांपूर्वी कसारा-शहापूर तालुक्यातील वाशिंद परिसरात क्रुझर जीप आणि ट्रकच्या अपघातात अब्दुल पाशा शेख (६५) आणि जाहीद सिद्दिकी (४०) यांचा मृत्यू झाला होता. यात दोन लहान मुले, तीन महिला आणि दोन पुरुषही जखमी झाले होते. या सगळ्या घटनांमुळे समृद्धी महामार्ग आता 'अपघाती महामार्ग' बनत चालला आहे का, असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाने याची दखल घ्यावी, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे.

## आंतरराज्यीय चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश

नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : पारडी पोलिसांनी आंतरराज्यीय चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली आहे. या टोळीतील आणखी दोन साथीदारांचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. अटकेत असलेल्या आरोपींनी शहरात एकूण सात घरफोड्या केल्याची कबुली दिली असून, त्यांच्या सांगण्यावरून पोलिसांनी सुमारे ११ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर घटना २१ जून रोजीची नागेश्वर नगरात राहणाऱ्या अनुपम वाघमारे या महिलेनं आपल्या घराला कुलूप लावून संपूर्ण कुटुंबासह पुलगावला गेलेल्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात घुसून सोनं-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. याबाबत वाघमारे यांनी पारडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, संदीप टेंभरे या कुख्यात चोराने आपल्या साथीदारांच्या मदतीने ही चोरी केली आहे. त्यानुसार पारडी पोलिसांनी मध्य प्रदेशातील सिवनी येथे जाऊन संदीप टेंभरे व त्याचा साथीदार महेंद्र कुशवाहा यांना अटक केली.सखोल

■ २ आरोपी अटकेत, ११ लाखांचा मुद्देमाल जप्त



चौकशीत त्यांनी नागपूर शहरात आणखी सात ठिकाणी चोरी केल्याचे कबूल केले असून, त्यांच्या माहितीवरून एकूण ११ लाखांहून अधिक किंमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. संदीप टेंभरेविरुद्ध याआधीही २० पेक्षा अधिक चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्याला जुगाराची लत असून, त्याच सवयीच्या पूर्ततेसाठी तो पुन्हा पुन्हा चोरी करत असल्याचं समोर आलं आहे.पुढील तपास पारडी पोलिस करत आहेत.

## विभागीय लोकशाही दिन १४ जूलै रोजी

नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : विभागीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक 14 जुलै 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. प्रशासनाकडे नागरिकांच्या प्रलंबित असलेल्या तक्रारींचा निपटारा व अनुषांगिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. लोकशाही दिनात अडचणी, गाऱ्हाणी व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कागदपत्रासंह सकाळी 11 ते 12 या वेळेत उपस्थित राहण्याचे सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त तेजुसिंग पवार यांनी कळविले आहे.

## शिक्षक भरती घोटाळा! शिक्षणाधिकारी कार्यालयातील अधीक्षक रवींद्र सलामे अटकेत, ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

भंडारा/नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : शिक्षक भरती घोटाळ्यातील कारवाईचा धडाका सुरूच असताना आता आणखी एका वरिष्ठ अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद भंडारा (सध्या नियुक्त - गडचिरोली) कार्यालयातील अधीक्षक रवींद्र पंजाबराव सलामे यांना नागपूर पोलिसांनी अटक केली आहे.सलामे यांच्यावर भादंवि कलम 420 , 465 , 468, 471, 472, 409, 120ब आणि 34 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना ६ जुलै २०२५ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात



■ बनावट नियुक्ती आदेश, बनावट अनुभव प्रमाणपत्राचा कट

■ अधीक्षक रवींद्र सलामे यांच्यावर सहभाग व कट रचण्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला

आले आहेत. या प्रकरणात आरोपी पराग नानाजी पूडके (रा. लाखनी) याने कोणत्याही शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून प्रत्यक्ष नियुक्ती न झालेला असतानाही, नानाजी पूडके विद्यालय, जेवणाळा या शाळेतील मुख्याध्यापक पदासाठी खोट्या नियुक्ती आदेश, सेवा सातत्याचे बनावट दस्तऐवज, आणि एस. के. बी. शाळा, यादव नगर, नागपूर या शाळेच्या लेटरहेडवर बनावट अनुभव प्रमाणपत्र तयार करून शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केले होते. ही बनावट कागदपत्रे आरोपी महेंद्र म्हैसकर याच्या मदतीने तयार करून अधीक्षक सलामे यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. सलामे यांनी संबंधित कागदपत्रे बघूनही त्यातील बनावटपणा न पाहता त्यावर पुढील प्रक्रिया केली. यामुळे त्यांच्यावर सहभाग व कट रचण्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात आधीच काही आरोपींना अटक झाली असून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. शिक्षक भरती प्रक्रियेत घोटाळा करून बनावट कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळवण्याचा हा प्रकार समोर आल्यानंतर शिक्षण विभागातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.





## सेंट्रल एव्हेन्यूवरील हॉटेल पॅराडाई वर छापा

■ नागपूरच्या मध्यवर्ती भागात देहव्यापार अड्डा; उझबेकिस्तानच्या महिलेची सुटका

नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : शहराच्या मध्यवर्ती भागात, वर्दळीच्या सेंट्रल एव्हेन्यू परिसरातील हॉटेल पॅराडाई मध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर देहव्यापार अड्ड्यावर सामाजिक सुरक्षा पथकाने धाड टाकत उझबेकिस्तानच्या एका विदेशी महिलेची सुटका केली. ही महिला दोन दिवसांपूर्वी नवी दिल्लीतील एका दलालामार्फत विमानाने नागपूरात आणली गेली होती, अशी माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी ही कारवाई हॉटेल पॅराडाईजमध्ये केली असून, खोली क्रमांक ४०३ मध्ये छापा टाकून ही महिला ताब्यात घेण्यात आली. बनावट ग्राहक पाठवून पोलिसांनी सापळा रचला होता आणि ७ हजार रुपये इतक्या व्यवहारात विदेशी महिला उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू असतानाच कारवाई करण्यात आली.याप्रकरणी रश्मि खत्री नावाची महिला ताब्यात घेतली असून, ती यापूर्वी या हॉटेलमध्ये व्यवस्थापक होती आणि सध्या भाडेतत्वावर हॉटेल चालवत होती. पोलिसांनी तिला समज देऊन सोडून दिले. तर मुख्य दलाल कृष्णकुमार उर्फ राधे देशराम (रा. नवी दिल्ली) हा सध्या फरार आहे, आणि त्याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.सामाजिक सुरक्षा पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली.

**■ कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह**

सेंट्रल एव्हेन्यू परिसर व्यापारी वस्ती म्हणून ओळखला जात असतानाही अशा प्रकारे देहव्यापाराचा अड्डा सुरू असणे ही गंभीर बाब मानली जात आहे.सुटविण्यात आलेल्या उझबेकी महिलेची वैद्यकीय तपासणी करून तिला तहसील पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. नागपूरसारख्या महत्त्वाच्या शहरात अशा प्रकारचे रॅकेट उघडकीस आल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## फरारी चालवली, नियम तोडले; १.४२ कोटींचा फटका!

बंगळुरू, ता. ४ : एका लक्झरी फेरारी कारच्या मालकाला, कार महाराष्ट्रात रजिस्टर असूनही ती बंगळुरूमध्ये सतत वापरल्यामुळे कर्नाटक RTO ने तब्बल ₹ 1 कोटी 42 लाखांचा रोड टॅक्स भरण्यास भाग पाडलं. काय आहे नेमकं हे प्रकरण? ही कार फेरारी SF90 स्ट्रॅडेल असून तिची किंमत सुमारे ₹ 7.5 कोटींपासून सुरू होते. गेल्या अनेक महिन्यांपासून बंगळुरूच्या रस्त्यांवर ही लाल रंगाची कार धावत होती. कार थांबवून तपासणी केल्यानंतर मालकाला, जास्त काळ दुसऱ्या राज्यात गाडी वापरल्याबद्दल, कर भरण्याचा आदेश देण्यात आला. बंगळुरूच्या रस्त्यांवर माजलेला फेरारीचा शो अखेर कर्नाटक RTO च्या रडारवर आला आणि मालिकाला थेट ₹ 1.42 कोटींचा रोड टॅक्स भरावा लागला! पण ही चर्चित गाडी महाराष्ट्रात रजिस्टर असूनही बंगळुरूच्या रस्त्यांवर धावणं मालकाला चांगलंच महागात पडलं.

**काय नेमकं घडलं?**

कर्नाटकातील RTO अधिकाऱ्यांनी गेल्या काही महिन्यांपासून लाल रंगाच्या फेरारीवर लक्ष ठेवले होते. तपासणीतून रजिस्ट्रेशन महाराष्ट्रातील असल्याचे उघड झाले. नियमांनुसार, इतर राज्यात ६ महिन्यांपेक्षा अधिक काळ गाडी वापरणं म्हणजे त्या राज्यात रजिस्ट्रेशन ट्रान्सफर करणं अनिवार्य! त्याचाच भंग झाल्यामुळे टॅक्स व दंड वसूल करण्यात आला.

## वाळू वाहतुकीसाठी मोकळा मार्ग

■ शासनाचा मोठा निर्णय!; कृत्रिम वाळू धोरणाचीही घोषणा

■ प्रत्येक घाटाचे जिओ-फेन्सिंग, GPS व CCTV अनिवार्य

नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : राज्य सरकारने वाळू वाहतुकीसंदर्भात एक मोठा आणि निर्णायक पाऊल उचलले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत जाहीर केले की, वाळू वाहतुकीस आता २४ तास परवानगी देण्यात आली आहे. तसेच, कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण देखील लागू करण्यात येत आहे.

आतापर्यंत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन आणि वाहतूक परवानगीने होत होती. पण सायंकाळी नंतर वाळू उचलण्यास बंदी असल्याने वाहतूक अडथळ्यांमुळे अवैध वाहतुकीत वाढ होत होती. हे रोखण्यासाठी आता महाखनीज पोर्टलवरून २४ तास ई-टीपी (Electronic Transit Pass) तयार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाने वाळू वाहतुकीत पारदर्शकता आणण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्याची घोषणा केली: प्रत्येक वाळू घाटाचे जिओ-फेन्सिंग घाटांवर आणि वाहतुकीच्या मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये जीपीएस डिव्हाइस अनिवार्य नैसर्गिक वाळूच्या मर्यादा लक्षात घेऊन, शासनाने कृत्रिम वाळू उत्पादनासाठी स्वतंत्र धोरण जाहीर केले आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार प्रत्येक युनिटसाठी ५ एकर जमीन दिली जाणार पुढील ३ महिन्यांत १००० क्रशर युनिट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट घरकुल योजना लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. बावनकुळे म्हणाले की, एनजीटीच्या अटीमुळे काही घाटांवर निर्बंध असले तरी, जिथे पर्यावरण परवानगीची आवश्यकता नाही, अशा घाटांवरून घरकुलासाठी वाळूचा पुरवठा सुरूच राहणार. चंद्रपूर जिल्ह्याचा उदाहरण देत मंत्री म्हणाले, "नवीन वाळू धोरणामुळे केवळ पहिल्या निविदेतूनच राज्याला १०० कोटी रुपयांची रॉयल्टी मिळाली आहे." यामुळे हे धोरण आर्थिकदृष्ट्या राज्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. एकूणच काय? राज्यातील वाळू उत्खनन, वाहतूक व वितरण या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता, कायदेशीरता आणि उपलब्धता आणण्याच्या दृष्टीने हे निर्णय महत्त्वपूर्ण मानले जात आहेत.

**■ कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरण**

### ठाकरे यांच्या मागणीनंतर मंत्रींचं आश्वासन; महाराष्ट्रात १२,८०० थॅलेसेमिया रुग्ण; थॅलेसेमियासारखा आजार रोखता येऊ शकतो

# थॅलेसेमिया निकृष्ट गोळ्यांची चौकशी, चाचणी सक्तीची

नागपूर, प्रतिनिधी ता. ४ : पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी विधानसभेत थॅलेसेमिया रुग्णांच्या समस्यांकडे लक्ष वेधल्यावर सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी खाजगी कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या आयर्न केलेशन गोळ्यांची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे सभागृहात आश्वासन दिले. तसेच, या औषधांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गुरुवारी (३ जुलै २०२५) चालू पावसाळी अधिवेशनात मंत्री यांनी पुढे



सांगितले की, ज्या कुटुंबात एकाचवेळी मायनर आणि मेजर थॅलेसेमिया रुग्ण आढळतात, अशा प्रकरणांमध्ये HPLC चाचणी सक्तीची करण्यासाठी लवकरच शासन नियमावली आणणार आहे. यासोबतच विवाहपूर्व HPLC चाचणी सक्तीची करता येईल का, याचा अभ्यास करण्यात येईल. या चाचण्या करून भविष्यात थॅलेसेमियासारखा गंभीर आजार रोखता येऊ शकतो. मंत्री महोदयांनी सभागृहात माहिती दिली की सध्या महाराष्ट्रात १२,८०० थॅलेसेमिया रुग्ण आहेत आणि ही बाब गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये सर्वाधिक रुग्ण विदर्भात आणि विशेषतः नागपूरमध्ये असल्याचे आमदार विकास ठाकरे यांनी अधोरेखित केले. त्यांनी मध्य नागपूरमधील डागा रुग्णालयात बांधण्यात आलेले पण अजूनही सुरू न झालेल्या सीव्हीएस केंद्राचे तात्काळ सुरुवात करण्याची मागणी केली. याशिवाय, बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी रुग्णांना १५ लाख रुपयांची विशेष आर्थिक मदत देण्याची योजनाही सुरू करण्याची त्यांनी मागणी केली.LAQ द्वारे आमदार विकास ठाकरे यांनी सांगितले की, थॅलेसेमिया हा अनुवांशिक आजार आहे आणि तो योग्य उपाययोजनांद्वारे नियंत्रित करता येऊ शकतो. जर मुलगा व मुलगी लग्नापूर्वी HPLC टेस्ट करून घेतली आणि दोघेही थॅलेसेमिया पॉझिटिव्ह आढळल्यास त्यांचा विवाह टाळला गेला. सरकारने HPLC चाचणी लग्नापूर्वी बंधनकारक करावी आणि दोघेही थॅलेसेमिया पॉझिटिव्ह आढळल्यास विवाहास मनाई करावी, जेणेकरून हा आजार संपुष्टात येईल, अशी मागणी आरोग्य तज्ज्ञांकडून होत असल्याचे आमदार विकास ठाकरे यांनी सांगितले.

**बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी रुग्णांना १५ लाख रुपयांची विशेष आर्थिक मदत देण्याची योजनाही सुरू करण्याची त्यांनी मागणीही यावेळी ठाकरे यांनी केली.**



- ■ महाराष्ट्रातील तसेच नागपूरमधील बहुतेक शासकीय रुग्णालयांमध्ये बजाज कंपनीची निकृष्ट दर्जाची औषधे आढळून आली असून ही औषधे लहान मुले घेण्यास नकार देत आहेत.
- ■ या कंपनीविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शासन नामांकित आणि दर्जेदार औषधांचा पुरवठा करणार का? असा प्रश्न आमदार विकास ठाकरे यांनी उपस्थित केला.
- ■ महाराष्ट्रात ३0 लाखांपेक्षा जास्त खर्च येणाऱ्या महागड्या बोन मॅरो ट्रान्सप्लांट (BMT) साठी, प्रत्यारोपणाचा खर्च परवडत नसलेल्या पात्र आणि गरजू थॅलेसेमिया रुग्णांसाठी, शासन इतर राज्य सरकारांप्रमाणे (जसे की छत्तीसगड) १५ लाखांचा विशेष निधी उपलब्ध करून देणार का?राज्यात सर्वाधिक थॅलेसेमिया रुग्ण नागपूरमध्ये असल्याचे लक्षात घेता, शासन नागपूरमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट त्वरित सुरू करणार का? असा प्रश्न आमदार विकास ठाकरे यांनी विधानसभेत उपस्थित केला.

इनसाइडर न्यूज टुडे



# आजीजवळ झोपलेल्या पाच वर्षीय नातीच्या अपहरणाचा प्रयत्न

## > आजीच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** नागपूर शहरात एक धक्कादायक घटना घडली असून, घरात आजीजवळ झोपलेल्या पाच वर्षीय चिमुकलीच्या अपहरणाचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, आजीच्या सतर्कतेमुळे मुलीचा जीव वाचला आणि मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी मानकापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ही घटना २७ जूनच्या पहाटेच्या सुमारास घडली. चार वर्षे अकरा महिन्यांची बालिका आपल्या आजीसोबत घरात झोपलेली होती. दरवाजा बंद असतानाही संशयित आरोपी श्रवणकुमार याने चलाखीने घरात प्रवेश केला आणि थेट झोपलेल्या मुलीकडे गेला. त्याने तिला उचलून नेत अपहरणाचा प्रयत्न केला.




मात्र घरात काही तरी हालचाल झाल्याचा आवाज आल्यामुळे आजीची झोप अचानकच मोडली. उठून पाहिल्यावर तिला नात जवळ नसल्याचे लक्षात आले. तिने पाहिले असता संशयित आरोपी तिच्या नातीला उचलून नेत असल्याचे दिसून आले. आजीने तत्काळ आरडाओरड सुरू केली. त्यामुळे घाबरलेल्या आरोपीने बालिकेला तिथेच सोडले आणि पळून गेला.

या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून, लवकरच आरोपीला अटक केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# भरधाव ट्रकच्या धडकेत गाय व गुराखी जागीच ठार

## राष्ट्रीय महामार्ग ४४ वरील चोरबाहुली परिसरातील घटना

**सचिन चौरसीयाः रामटेक, ता. ४ :** नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.४४ वरील चोरबाहुली शिवारातील रेती भरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने रस्त्याचा बाजूला असणाऱ्या गुराखी व गाईला जोरदार धडक दिल्यामुळे गुराखी व गाय जागीच ठार झाले. ही घटना (दि.३) ला सायंकाळच्या ६.०० वाजताच्या सुमारास घडली. कालु असे मृतक गुराख्याचे नाव आहे.

प्राप्त माहीतीनुसार नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग ४४ चोरबाहुली शिवारात हा दुर्दैवी अपघात झाला. नागपूर दिशेने एमएच/४० सीएम/५७६५ रेती भरून भरधाव वेगाने जात असलेल्या चोरबाहुली येथील यादव यांच्या कडे कालू (टोपण नाव) हा गुराखी म्हूणन काम करायचा. जंगलातून जनावरे चारून सायंकाळचा सुमारास घराकडे जात असतांना अचानक महामार्गावर रस्त्यावर एक गाय आली असता समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकचालकास गाय दिसताच तिला वाचविण्याच्या नादात भरधाव ट्रकने गाईला जोरदार धडक देत महामार्गाचा रस्त्याचा बाजूला उभा असलेल्या गुराखीला चिरडून रस्त्याचा बाजूला ट्रक कोसळून पलटी झाला. या अपघातात गुराखी व गाय जागीच ठार झाले. चोरबाहुलीचे पोलीस पाटील योगेश कंगाली यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. देवलापार पोलिसांनी पंचनामा करून ट्रकचालकाला ताब्यात घेतले आहे. ट्रकचालक आरिफ खान (३०) व कंडक्टर सोहेल खान (२१) या दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे. कंडक्टरला उपचारासाठी मनसर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. रामटेक पोलीस पुढील तपास करीत आहेत.



**महामार्ग पोलिसांकडून व्हावी कारवाई**

नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांच्या संचार असल्याचे नेहमीच बघावयास मिळत असते. याच मोकाट जनावरांमुळेच महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होताना दिसून येते. या सर्व मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून जनावरांना मोकाट सोडणाऱ्या पशुपालकांवर महामार्ग पोलिसांकडून कारवाई व्हावी अशी मागणी जोर धरत आहे

# अग्रलेख

## साडेतीन कोटी नोकऱ्या!

**पुढील दोन वर्षांत देशात तब्बल साडेतीन कोटी नोकऱ्या निर्माण होणार असल्याची शुभवार्ता येऊन धडकली आहे. केंद्राने १.०७ लाख कोटी रुपयांच्या खर्चासह रोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या 'ईएलआय' योजनेला मंगळवारी मंजुरी दिली.**



केंद्राकडून एक आनंदवार्ता आली आहे. सर्वाधिक युवकांचा देश म्हणून जगात भारताचा गौरव होतो. असा बहुमान बाळगणे, ही म्हटले तर दुधारी तलवार पेलण्याजोगी स्थिती असते. संशोधन आणि पायाभूत विकासाच्या क्षेत्रात भक्कम काम करण्याची सुवर्णसंधी युवकांमुळे देशाला लाभते, यात वाद असण्याचे कारण नाही. चैतन्य आणि उत्साहाने भारलेली पिढी कोणत्याही देशाचे भविष्य मजबूत करण्याचे काम करते. अर्थात, या पिढीच्या अपेक्षांचा डोंगर न पेलविणारा असतो. भारतातील स्थिती याहून वेगळी नाही. प्रत्येक निवडणुकीत मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या पहिल्या पाच महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये बेरोजगारीचा समावेश असतो.

शिक्षण, उद्योग, शेती, तंत्रज्ञान आणि शासकीय धोरणे या सर्वांशी बेरोजगारीचा निकटचा संबंध आहे. या क्षेत्रातील अस्वस्थतेचा थेट राजकीय परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, बेरोजगारीच्या समस्येने त्रस्त झालेल्या तरुणांना केंद्र सरकारने दिलासा दिला आहे. पुढील दोन वर्षांत देशात तब्बल साडेतीन कोटी नोकऱ्या निर्माण होणार असल्याची शुभवार्ता येऊन धडकली आहे. केंद्राने १.०७ लाख कोटी रुपयांच्या खर्चासह रोजगाराला प्रोत्साहन देणाऱ्या 'ईएलआय' योजनेला मंगळवारी मंजुरी दिली. देशातील सर्वाधिक कळीच्या मुद्द्याला या निर्णयामुळे स्पर्श होणार असल्याने, त्याचे सकारात्मक पडसाद उमटतील, अशी आशा आहे. कोट्यवधी बेरोजगारांना आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठी ही योजना सहायक ठरेल. सरकारने २०२४-२५च्या केंद्रीय अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती.

बेरोजगारीतून उद्भवलेल्या आर्थिक विवंचनेमुळे देशाला मोठ्या समस्यांचा सामना करावा लागतो आहे. जगातील बेरोजगारीचा सर्वाधिक दर दक्षिण आफ्रिकेमध्ये असल्याचे बोलले जाते. भारतासारख्या विकसनशील; परंतु सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात युवकांची भूमिका निश्चितच महत्त्वाची ठरते. सुशिक्षित तरुणांची रोजगाराविषयीची आकांक्षा पूर्ण न झाल्याने त्यांचा असंतोष उफाळून येतो. बेरोजगारी दरातील चढ-उतार देशाच्या वाढीवर आणि विकासावर दूरगामी परिणाम करतात. विरोधी पक्षांनी बेरोजगारीच्या मुद्द्यावरून सरकारला सातत्याने लक्ष्य केले आहे. भावनिक संघर्षात युवकांना अडकविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही होत असतो. काही महिन्यांपूर्वी नवी दिल्लीतील युवकांच्या संघटनांपुढे बोलताना राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशाचे भविष्य आणि शिक्षण व्यवस्था संपविण्याचा चंग बांधला असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी बेरोजगारी व महागाईबद्दल अवाक्षरही काढत नसल्याचा आरोप केला होता. पंतप्रधान कुंभमेळ्याबद्दल बोलतात. मात्र, त्यांनी देशाच्या भविष्याबद्दल बोलायला हवे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली होती. देशाचे भविष्य असलेल्या युवा पिढीला आश्वस्त करणारी योजना देऊन केंद्र सरकारने नजीकच्या काळातील असंतोषावर फुंकर घालण्याचे काम केले, असे म्हणता येईल.

इन्स्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन यांनी वर्षभरापूर्वीच भारतीय रोजगार अहवाल तयार केला. भारताची काम करणारी लोकसंख्या २०११मध्ये ६१ टक्क्यांवर होती. २०२१मध्ये ती ६४ टक्क्यांपर्यंत वाढली. २०३६मध्ये ती ६५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. अशा अवस्थेत युवकांना आत्मनिर्भर करणाऱ्या योजनांचे स्वागत व्हायला हवे. शाश्वत रोजगार वाढीला चालना देण्यासाठी आणि देशाची भविष्यातील समृद्धी सुरक्षित करण्यासाठी प्रभावी धोरणात्मक उपाययोजना हव्या असतात. अधिकाधिक लोकांना रोजगार पुरविण्याची क्षमता असलेल्या कंपन्या आणि व्यवसायांना सरकार निधी उपलब्ध करून देईल. सहा महिने कंपनीत राहणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यापोटी कंपन्यांना दोन वर्षांसाठी तीन हजार रुपये मिळणार आहेत. अर्थात, केवळ योजनांच्या घोषणेने समस्या संपतील, या भ्रमात सरकारला राहता येणार नाही.

गुणवत्तापूर्ण, कौशल्याभिमुख शिक्षण प्रणालीचा प्रसार करतानाच स्टार्टअप, स्वरोजगार व उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याच्या धोरणाला अधिक चालना द्यावी लागेल. युवकांच्या मानसिक आरोग्यासंदर्भात जागरुकता व समुपदेशनाकडेही लक्ष द्यावे लागेल. योग्य मार्गदर्शन, करिअर काउन्सिलिंगवर भर द्यायला हवा. युवकांसाठी सकारात्मक व्यासपीठे, क्रीडा आणि सांस्कृतिक सुविधा अलक्षित राहता कामा नये. साडेतीन कोटी नोकऱ्यांनी जादूची कांडी फिरेल असे नाही. नोकरी वाटपात पारदर्शकता हवी. राजकीय प्रक्रियेत युवकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. युवकांमधील ऊर्जा, कल्पकता आणि जिद्दीला पैलू पाडण्याचे काम या योजनेतून व्हावे, ही अपेक्षा आहे. शेजारी राष्ट्रांपासून धोका असलेल्याच्या काळात अंतर्गत सुरक्षा आणि शांततेसाठी आश्वासक युवा पिढी हाताशी असणे ही मोठी गोष्ट असेल.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे नावावर करुन घेतली कार

## फसवणुकीचा गुन्हा दाखल, अगस्ती आश्रमातील संत तुकाराम बाबांच्या गाडीशी संबंधित घटना

**सचिन चौरसीया : रामटेक, ता. ४ :** गडमंदिर येथील अगस्ती आश्रमातील संत तुकाराम बाबांची गाडी फसवणूक करून तिच्या नावावर करून घेणाऱ्या अलका धनंजय फुटाणे (दटके) यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. १ जुलै रोजी रामटेक पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलिस तपासानंतर आणखी अनेक प्रकरणे उघडकीस येण्याची अपेक्षा आहे. माहितीनुसार, संत तुकाराम बाबा यांचे २४ डिसेंबर २०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या नावावर ४ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी इको कार क्रमांक एमएच-४० बीई-७८११ होती. पण अलकाने बनावट कागदपत्रे तयार करून २२ फेब्रुवारी २०२४ रोजी कारची नोंदणी तिच्या नावावर करून घेतली. पोलिसांनी आरटीओकडून कारची कागदपत्रे मागितली तेव्हा हा फसवणूक उघडकीस आली. पोलिसांनी अलकाविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. संत गोपाल बाबा व तुकाराम बाबा यांचे शिष्य बालचंद पुंडलिक खोडे रा. जयप्रकाश वार्ड, रामटेक यांनी २४ एप्रिल २०२४ रोजी अलका धनंजय फुटाणे (दटके) यांच्या विरोधात संत तुकाराम बाबा यांची कार क्रमांक एमएच-४०-बीई-७८११ या नावाने फसवणूक केल्याप्रकरणी रामटेक पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी आरटीओकडून कागदपत्रे तपासली आणि ग्रामीण पोलिस अधीक्षकांकडून गुन्हा नोंदवण्याची परवानगी मिळाल्यानंतर, १ जुलै रोजी अलका फुटाणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

**आश्रमाशी काहीही संबंध नाही:** संत गोपाळ बाबांच्या मृत्युपत्रात त्यांची संपूर्ण मालमत्ता त्यांचे शिष्य तुकाराम बाबांच्या नावावर हस्तांतरित करण्यात आल्याचे बालचंद खोडे यांनी सांगितले. परंतु आश्रमाशी कोणताही संबंध नसतानाही, अलका यांनी फसवणूक करून गोपाळ बाबांची गाडी स्वतःच्या नावावर केली. आश्रमाशी संबंधित महत्त्वाची आणि आवश्यक कागदपत्रे चोरल्याचाही अलकावर आरोप आहे. ठाणेदार रवींद्र मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली रामटेक पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# मृतक यांचा कुटुंबीयांची राजेंद्र मुळक यांनी सांत्वनपर भेट



**सचिन चौरसीया : रामटेक, ता. ४ :**तालुक्यातील मौजा लोधा (पिंडकेपार) येथे वाघाच्या हल्ल्यात मृत पावलेले स्व. बालकरामजी ढोबळे यांच्या कुटुंबियांची माजी मंत्री राजेंद्रजी मुळक सांत्वनपर भेट घेतली. स्व. बालकरामजी ढोबळे यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दुःखद आहे. या दुःखातून सावरण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

त्याचबरोबर या भागातील वाघांचे दिवसेंदिवस वाढणारे हल्ले लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील असेही त्यांनी यावेळी सांगितले. व त्याना काहिशी आर्थिक मदतही केली.

यावेळी जिल्हा परीषदेच्या माजी सदस्या शांता कुमरे, कैलास राउत, माजी पंचायत समिती सदस्या महेश मडावी, यशोदाताई ढोबळे, सरपंच विलास उईके करवाहीचे सरपंच रंजीत कोकोडे, पोलीस पाटील पंचफुला मर्सकोल्हे, हरीशकुमार गुप्ता, कैलाश निघोट, यशपाल ढोबळे, कमलेश केवटे, विशाल घंगारे, देवीप्रसाद रंगडाले, विनोद ढोबळे, अशोक ढोबळे, दीपचंद मरसकोल्हे व कुटुंबीय आदी उपस्थीत होते.

# घोटमुंढरी जि प शाळेतील सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचे शाल, त्रिफळ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार

**किशोर शाहू, कोदामेंढी, ता. ४ :** दिनांक 30 जून रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले घोटमुंढरी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शेषराव आंबीलढुके यांचे सेवानिवृत्त सपत्नीक सत्कार समारंभ कार्यक्रम एक मंगळवार (दि. 1 जुलै) ला स्थानिक सार्वजनिक हनुमान मंदिरात घेण्यात आले. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार समारंभात आलेल्या लोकप्रतिनिधी, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी, पुढारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सहकारी शिक्षक वृंद, मित्रपरिवार यांनी त्यांच्या शाल, त्रिफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.




याप्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल, माजी जि प सदस्या राधा मुकेश अग्रवाल, सरपंच चंदा गेडाम, सिटी इंडिया न्यूज चॅनलचे नागपूर जिल्हा उपसंपादक अनिल ढोलवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उदय पांडे, परिसरातील शिक्षक वृंद पडोळे , एम एम लोणीया, विनोद हुमणे, विकास धारगावे, नरेश आचले, अमृते, नाटकर , कुकडे , मोहन घुगुसकर, संजय आंबीलढुके, सुखदेवे , दंडारे , वाघमारे , वानखेडे , मेश्राम , रामटेके , डोडरे , प्राध्यापिका पटले , ठाकरे, देवतारे, कुरसुंगे , रहाटे, मेश्राम, सुरेखा सलामे, श्वेता खडगि, एलव्ही, प्रल्हाद चुटे, जिल्हा परिषद शाळा घोटमुंढरी मधील शिक्षकवृंद वासनिक, किरपान, महादुले , मनोज वंजारी, वंदना खेताडे , थुलकर, शिल्पा खंडाईत, सुधीर खंडाईत, सर्व ग्रामपंचायत सदस्य गण, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारमूर्ती सेवानिवृत्त मुख्याध्यापक शेषराव आंबिलढुके सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, माझ्या कार्यकाळात स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य गण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्यगण, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने शाळेला क्रीडा, सांस्कृतिक, बौद्धिक व इतरही क्षेत्रात जिल्ह्यात नावलौकिक करून दिले. सतत पाठपुरावा करून शाळेच्या सुसज्जित इमारती करिता दीड कोटी रुपये आणले व इतरही सर्व भौतिक सुविधा शाळेला प्राप्त करून दिले. पुढे मुख्याध्यापक म्हणून रुजू होणाऱ्या शिक्षकांनी शाळेची ही परंपरा कायम ठेवून या गावाचे नाव व या शाळेचे नावाचे जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही लौकिक करावे.

# राज्य थलेसेमिया मुक्त करा

## प्रवीण दटके यांचे सरकारला आवाहन

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसा रूपात संक्रमित होणाऱ्या थॅलेसमिया या अनुषंगिक आजाराच्या मुक्तीसाठी केंद्र आणि राज्याने मिशन हाती घेतले आहे, परंतु ही मोहीम अधिक तीव्र करण्याची गरज असल्याचे दटके यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले. विदर्भात आणि विशेषतः नागपुरातच या आजाराचा टक्का चिंतन टाकणारा आहे. रुग्णांची संख्या निश्चित करण्यासाठी जास्तीत जास्त स्क्रीनिंग करण्याची आवश्यकता आहे.

नागपुरात मेयो आणि मेडिकलने एकत्रितपणे आतापर्यंत 1 लाख 38 हजार 408 जणांची तपासणी केली आहे , ही चाचणी अधिक व्यापक करून जास्तीत जास्त तपासण्या करण्यासाठी शासन कार्यक्रम आखणार आहे का ?

शासनाच्या एसओपीप्रमाणे आरोग्य संस्था, नागपूर येथे प्रशिक्षण घेण्याबाबत कळविण्यात आले होते. आत्तापर्यंत किती प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले , याची माहिती सभागृहाला देणार का ?

थॅलेसेमिया रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध करून, नियमित तपासणी करून , रुग्णांना वेळेत रक्त मिळावे यासाठी एक समर्पित योजना तयार करणार का ?

विशेषतः विदर्भात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी विशेष प्रयत्न करणार का ?

असे स्पेसिफिक प्रश्न आमदार प्रवीण दटके यांनी आरोग्य मंत्र्यांना विचारले, यावेळी दटके यांच्या प्रश्नाला उत्तर देताना परभणीच्या धर्तीवर संपूर्ण राज्याकरिता एसओपी तयार केली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणार असल्याचे आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक प्रवेशासह विविध सुविधा

## ■ प्रवेश प्रक्रिया सुरू, अर्ज करण्याचे आवाहन

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** दिव्यांग कल्याण विभागांतर्गत नागपूर येथे तीन शासकीय दिव्यांग संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्र नागपूर व शासकीय दिव्यांगांची कर्मशाळा हे नागपूर येथील मंगळवारी बाजार सदर येथे तर शासकीय दिव्यांग बाल विकास गृह हे प्रतापनगर येथे कार्यरत आहेत. या संस्थामध्ये दिव्यांग प्रवर्गातील अस्थिव्यंग व मुकबधीर विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक, वैद्यकीय व व्यावसायिक पुनर्वसन शासनामार्फत निशुल्क करण्यात येते.

शासकीय बहु दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्र नागपूर व शासकीय दिव्यांग बाल विकास गृह प्रतापनगर नागपूर येथे वयोगट 6 ते 16 वर्षे वयोगटातील अस्थिव्यंग व मुकबधीर विद्यार्थ्यांना ईय्यता । ली ते 12 वी पर्यत शहरातील अग्रगण्य मराठी शाळेतून मोफत शिक्षण उपलब्ध करून दिल्या जाते तसेच या विद्यार्थ्यांना मोफत वसतिगृह, आवश्यक शैक्षणिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तके, श्रवणयंत्रे व नियमित व्यायामाच्या सोयी सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात. शासकीय दिव्यांगांची कर्मशाळा सदर नागपुर येथे वयोगट 18 ते 35 वर्षे वयोगटातील व्यावसायिक आमेचर कोसेंस जसे संगणक प्रशिक्षण, वाईन्डीग व पुस्तक मेकिंग इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रम मोफत शिकविले जातात तर हे कोसेस ला प्रवेश घेणा-या दिव्यांग व्यक्तीना मोफत वसतिगृह, आवश्यक शैक्षणिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तके व श्रवणयंत्रे इत्यादी सोयी सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात. या तिन्ही शासकीय संस्थेतील सन 2025-26 या वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून प्राधान्याने प्रथम येणा-या दिव्यांग व्यक्तीस प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येते. जिल्ह्यातील अस्थिव्यंग व मुकबधीर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना या सुविधांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर येथे तर संपर्क क्र. 9970134249 / 9423635379 येथे संपर्क साधून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी केले आहे

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या 40 प्रकरणांची नोंद

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :**नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. )गुरूवार (ता.3) रोजी शोध पथकाने 40 प्रकरणांची नोंद करून 47,500/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 17 प्रकरणांची नोंद करून 6,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.400/-दंड) या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 800/- रूपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 07 प्रकरणांची नोंद करून 17,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.वर्कशॉप,गॅरेजेस व इतर दुरूस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 01प्रकरणाची नोंद करून रू.1000/- वसुली करण्यात आली.उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 12 प्रकरणांची नोंद करून 2,400/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 16 प्रकरणांची नोंद करून रु.16,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.




तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत प्रकाश बारसकर यांच्यावर रस्त्यालगत सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले. धरमपेठ झोन अंतर्गत मे.दिल्ली पब्लिक स्कुल यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 10,000/- चे दंड वसुल करण्यात आले.तसेच मे. अनुष्का कंस्ट्रक्शन यांनी चेंबर तोडल्यामुळे रू.10,000/- चे दंड वसुल करण्यात आले. राखी बलवीर सिंग यांनी अनधिकृत ठिकाणी कचरा टाकल्याबद्दल रू.5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. हनुमान नगर झोन अंतर्गत मे. अष्टविनायक बिल्डर्स यांनी रस्त्यालगत सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसूल करण्यात आले.मे. संजय उपहार गृह यांनी अनधिकृत ठिकाणी कचरा टाकल्याबद्दल रू.5,000/- चे दंड वसुल करण्यात आले.धंतोली झोन अंतर्गत मे. हॉटेल स्टँडर्स यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे.पारस डेअरी यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. आशीनगर झोन अंतर्गत मे. आर.के. ड्रिस्टीब्युटर्स यांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. मंगळवारी झोन अंतर्गत मे.टु व्हॅल्यु प्रोजेक्ट यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूली करण्यात आली. उपद्रव शोध पथकाने 10 प्रकरणांची नोंद करून रू. 65,000/- दंड वसूल केला.

मुद्रक, प्रकाशक व संपादक दिनेश खेमसिंग दमाहे यांच्या वतीने मिडिया प्रिन्ट ७९७, मिश्रा किराणा स्टोर्स जवळ, नविन बाबुळखेडा, पार्वती नगर, नागपूर ४४००२७ येथे मुद्रित करुन सांध्य दैनिक प्लॉट क्र. १५९, महाजन ले आऊट, महाजन लॉन जवळ सावनेर तह. सावनेर जि. नागपूर - ४४११०७ (महाराष्ट्र राज्य) येथून प्रकाशित. (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदार) मो. 9370868686, Email-insidernewstoday@gmail.com

# मनपातर्फे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम सुरु

■ ब्रिडींग चेकर्स करणार घरांची तपासणी, नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**चंद्रपूर, प्रतिनिधी ता. ४ :** मनपा आरोग्य विभागामार्फत संभाव्य डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम राबविण्यात येत असुन या अंतर्गत आरोग्य चमु शहरातल्या प्रत्येक घरांची तपासणी करणार असल्याने घरी येणाऱ्या ब्रिडींग चेकर्सना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पावसाळा सुरु होताच डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांचा प्रसार होण्यास सुरवात होते. पावसात मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे,घरातील कूलर, टायर,कुंड्या खालील प्लेट, फ्रीज खालील ट्रे,पाण्याचे ड्रम, फिश टँक, एसीचे पाणी पडणारे कंटेनर, भंगारातील वस्तु,डबे इत्यादी ठिकाणी पाणी साचुन राहते व याच जागा डासांची उगमस्थाने बनतात. या उगमस्थानांचा शोध घेऊन ती नष्ट करणे व नागरीकांना सचेत करणे यासाठी आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात डॉ. नयना उत्तरवार यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात 28 ब्रिडींग चेकर्स, 32 एएनएम, 22 एमपीडब्लु व 170 आशा वर्कर तसेच स्वच्छता निरीक्षक यांच्याद्वारे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे.



डेंग्यु डास हा स्वच्छ व साचलेल्या पाण्यात आढळतो त्यामुळे आपल्या घराची स्व- तपासणी करणे देखील आवश्यक आहे.प्रत्येकाने आपल्या घरातील पाणी साठवण्याची भांडी आठवड्यातून एकदा कोरडी करून,पुसून वाळवणे आवश्यक आहे जेणेकरून डास अंडी निर्माण होणार नाही. डासअळी आढळल्यास अबेट द्रावण टाकणे, पाणी साठा मोठा असले तर त्यात गप्पी मासे टाकणे आवश्यक आहे. गप्पी मासे पाण्यातील डासांची अंडी खाऊन टाकतात ज्याने डासांचा प्रादुर्भाव कमी होतो. डेंग्यु डासाची उत्पत्ती टाळणे आवश्यक असल्याने आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस पाळावा. लक्षणे - डासांमुळे पसरणाऱ्या आजारांमध्ये डेंग्यूताप व डेंग्यू रक्तस्त्रावी ताप हे मुख्य आजार आहेत. ताप येणे, अंगावर पुरळ येणे, डोळ्याच्या खोबणीमधे दुखणे, पाठदुखी, डोकेदुखी, स्नायूमध्ये वेदना, सांधेदुखी ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे आहेत.ताप आल्यास वैद्यकीय सल्ला शिवाय कुठलीही औषधे घेऊ नये. वस्तुतः डेंग्यू हा सामान्य आजार आहे परंतु सर्वसामान्यांना या रोगाबाबत माहिती नसल्याने किंवा अपुरी माहिती असल्याने काही वेळा तो जीवघेणा ठरू शकतो. म्हणून प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिकेद्वारे याबाबत नागरिकांना वारंवार माहिती देऊन जनजागृती करण्यात येत आहे.

**बचाव कसा करावा** – संभाव्य डेंग्यु व इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधास पुढील काही दिवस महत्वाचे आहेत. प्रत्येक घरातील एका व्यक्तीने दररोज फक्त दहा मिनिटे पुढील दहा आठवडे घराची पाणी साचलेले सर्व कंटेनर यांची स्व तपासणी केल्यास निश्चितच डेंग्यू आजारापासून बचाव होऊ शकतो. आधी ज्या घरांमध्ये रुग्ण आढळले होते ते व संभाव्य दुषित घरे यावर विशेष लक्ष ठेवले जात असुन नागरीकांनी आपल्या घरी साचलेले पाणी राहु नये यांची काळजी घेण्याचे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# भौगोलिक परिस्थितीनुसार पारंपरिक कृषी पंप देण्याचा शासनाचा विचार - ऊर्जा राज्यमंत्री



**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषी पंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौर पंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषी पंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सीआरआय कंपनीच्या सोलार पंपाच्या तक्रारीबाबत मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनीही सहभाग घेतला.

राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशातील ५० टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्याला अनुसरून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातही सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन दिले असून मागेल त्याला सौर पंप देण्याची योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे सौर पंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीमार्फत लावण्यात आलेल्या सौर कृषी पंपांबाबत आलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कंपनीला १३ लाखाचा दंडही करण्यात आला असल्याचेही राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी यावेळी सांगितले. या कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांनी ५४४ तक्रारी नोंदवल्या होत्या. यातील ५४२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून, उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्त्रोत कोरडा झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जिथे पाण्याची पातळी खालावली आहे, अशा ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्त्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोचविण्यात येत आहे, असेही राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले.

# सहकार वर्षानिमित्त नेर येथे निबंध स्पर्धेचे आयोजन

**यवतमाळ, प्रतिनिधी ता. ४ :** सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, नेर व नेर अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी मर्यादित नेरच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्याचे घोषित केलेले आहे. त्याअनुषंगाने सहकार विभागामार्फत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी ५ जुलै रोजी अंतरराष्ट्रीय सहकार दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. तसेच दि.६ जुलै रोजी केंद्र शासनामध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापनेला ४ वर्ष पूर्ण झाल्याच्या अनुषंगाने दि. ६ जुलै हा दिवस चौथा स्थापना दिवस म्हनून साजरा करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने दि.1 जुलै ते 6 जुलै या कालावधीमध्ये क्षेत्रीय स्तरावर विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. नेर तालुक्यामध्ये सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, नेर व नेर अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी, मर्यादित नेरच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

निबंधक स्पर्धेचा विषय देशाच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीची भुमिका हा असून स्पर्धेत वर्ग 7 ते 10 चे सहभाग घेऊ शकतील. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख दि.5 जुलै असून स्पर्धेचे स्थळ राजर्षी शाहू महाराज इंग्लिश मेडीयम स्कुल, बहीरम नगर, नेर आहे.

निबंधक स्पर्धा दि.6 जुलै रोजी दुपारी 12 ते 1 दरम्यान होईल. बक्षीस वितरण दि.7 जुलै रोजी दुपारी 12 वाजता राजर्षी शाहू महाराज इंग्लिश मेडीयम स्कुल नेर येथे होईल.

प्रथम बक्षीस 5 हजार रुपये, द्वितीय बक्षीस 4 हजार रुपये, तृतीय बक्षीस 3 हजार रुपये, चौथे बक्षीस 2 हजार रुपये व पाचवे बक्षीस 1 हजार रुपये आहे, असे सहकार अधिकारी श्रेणी-1 एम.एम.भगत यांनी कळविले आहे.

# पालकमंत्री पवारांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीमुळे बीड येथे 'सीट्रिपलआयटी' उभारणीच्या कामाला गती

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बीड येथे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात 'सीट्रिपलआयटी'साठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक तीन मधील चार हजार चौरस मीटर जागा तसेच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय 'एमआयडीसी'च्या संचालक मंडळाने घेतला आहे.

या निर्णयामुळे बीड जिह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण बैठका घेऊन 'सीट्रिपलआयटी'च्या उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली आहे. 'एमआयडीसी'च्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे केंद्रासंदर्भातील त्रिपक्षीय करार आणि प्रकल्पाचे भूमीपूजन लवकरच होईल अशी अपेक्षा आहे. गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात नगरपरिषदेतर्फे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून 'सीट्रिपलआयटी' यापूर्वीच सुरु करण्यात आली आहे. रत्नागिरी येथे औद्योगिक क्षेत्रात 'सीट्रिपलआयटी' सुरु करण्यासाठी 'एमआयडीसी'ला योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. शिर्डी येथील 'सीट्रिपलआयटी'साठी एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच धर्तीवर बीड येथील 'सीट्रिपलआयटी'साठीही एमआयडीसीने निधी उपलब्ध करुन देण्याचा तसेच योजना अभिकर्ता म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा निर्णय एमआयडीसीच्या संचालक मंडळाने घेतला आहे. त्यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनी बीड जिल्ह्यासाठी 191 कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करणार आहे. कंपनीने तशा आशयाचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. या नव्या सेंटरमधून दरवर्षी 7 हजार युवकांना प्रशिक्षित केले जाणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

# सहकार पुरस्काराकरीता अर्ज आमंत्रित

**गडचिरोली, प्रतिनिधी ता. ४ :** राज्य शासनाच्या सहकार विभागाकडून 2021 ते 2024 या कालावधीत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना गौरविण्यासाठी सहकार पुरस्कार वितरणाचा कालबध्द कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारांसाठी इच्छुक संस्थानी 18 जुलैपर्यंत सबंधित तालुका सहाय्यक निबंधक किंवा उपनिबंधक कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या पुरस्कारांतर्गत एकूण 45 संस्थाना पुरस्कार दिले जाणार आहेत. त्यामध्ये सहकार महर्षी पुरस्कार एक ( संस्था 1 लाख रुपये), सहकार भुषण पुरस्कार 21 संस्था 51 हजार रुपये, आणि सहकार निष्ठ पुरस्कार 23 संस्था, 25 हजार रुपये यांचा समावेश आहे. सर्व पुरस्कारासोबत स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. संस्थांच्या निवडीसाठी मुल्यांकन निकष ठरविण्यात आले असून नोंदणी, वार्षिक सर्वसाधारण सभा, नफा-तोटा, थकबाकी, कायदेशीर कारवाई, लेखापरिक्षण, दोषदुरुस्ती अहवाल, निवडणूक आदी बाबींना 50 गुण, संस्था प्रकारानुसार विशेष निकषांना 35 गुण, संस्था प्रकारानुसार विशेष निकषांना 35 गुण, तर सहकार चळवळ , जनतेसाठी योगदान, सार्वजनिक व धर्मादाय मदत यांना 20 गुण देण्यात येणार आहेत. असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गडचिरोली यांनी कळविली आहे.

# चंद्रपूर प्रदूषण प्रश्नावर उपाययोजना सुरू –पंकजा मुंडे

■ प्रदूषण नियंत्रणासाठी सरकार कटिबद्ध

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** चंद्रपूर परिसरातील औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा खाणी व स्टील उद्योगांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या प्रश्नावर शासन जागरूक असून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेत दिली.

अर्धातास चर्चेदरम्यान उपस्थित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुंडे बोलत होत्या. मंत्री मुंडे म्हणाल्या की, चंद्रपूर परिसर 2010 मध्ये "क्रिटिकली पॉल्युटेड एरिया" (CPA) म्हणून नोंदवलेला होता, मात्र विविध उपायांमुळे प्रदूषण निर्देशांक 83 वरून 54 वर आला आहे.

यामुळे काही उद्योगांना अटींवर परवानग्या देण्यात आल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी उद्योगांना ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर), डस्ट कलेक्टर, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, जलप्रदूषण नियंत्रणासाठी ट्रीटमेंट प्लांट, पाण्याचा पुनर्वापर, रस्त्यांचे पक्कीकरण व फवारणीसारख्या अटी बंधनकारक करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य शासन वेळोवेळी उद्योगांना नोटिसा देऊन तपासणी करीत आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदूषण नियंत्रणासाठी निधीही वितरित करण्यात आला आहे. मात्र काही ठिकाणी निधी खर्चात अंमलबजावणी कमी असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

# पोंभुर्णा औद्योगिक वसाहतीबाबत शासन सकारात्मक –उद्योग राज्यमंत्री

**मुंबई/पोंभुर्णा, प्रतिनिधी ता. ४ :** चंद्रपूर जिल्ह्यातील कोसंबी पेठ ता. पोंभुर्णा येथे औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत शासन सकारात्मक आहे. या औद्योगिक वसाहतीसाठी 102.50 हेक्टर जमिनीची आवश्यकता असून संपादनासाठी 6 कोटी 7 लाख 52 हजार रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यापैकी 42.59 हेक्टर जमीन संपादनाला थेट खरेदीद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित भूसंपादन प्रक्रिया 60 दिवसात पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी आज विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

पोंभुर्णा औद्योगिक वसाहतीसाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देणेबाबत सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.



चर्चेच्या उत्तरात राज्यमंत्री नाईक म्हणाले, थेट खरेदीद्वारे मान्यता दिलेला 42.59 हेक्टर जमिनीसाठी 25 शेतकऱ्यांना 2 कोटी 35 लक्ष रुपयांचा मोबदला देण्यात आलेला आहे. तसेच 19 शेतकऱ्यांना मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याचप्रमाणे 34.38 हेक्टर जमिनीचा निवडा स्तरावर असून याच वर्षी ही जमीन संपादित करण्यात येणार आहे.

पोंभुर्णा औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत अधिवेशन काळातच संबंधित विभागाची बैठक आयोजित करण्यात येईल. तसेच या औद्योगिक वसाहतीची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी दौराही करण्यात येईल, असेही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी सांगितले.

# शाळाबाह्य विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा प्रयत्न -दादाजी भुसे

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवत आहे. यु-डायस प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले. नियम 92 अन्वये अर्धातास चर्चेला उत्तर देतं मंत्री भुसे बोलत होते.



मंत्री भुसे म्हणाले की, अनेक विद्यार्थी दहावी नंतर आयटीआय, डिप्लोमा आदी अभ्यासक्रमांकडे वळतात. मात्र, त्यांच्या शाळेतील रेकॉर्ड अद्ययावत होत नसल्यामुळे ते 'ड्रॉपआउट' म्हणून नोंदविले जातात. राज्यात शाळाबाह्य विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १ ते १५ जुलै दरम्यान विशेष मोहिम राबवली जात आहे. आधार लिंकिंग आणि अपार आयडी (विद्यार्थ्यांसाठी युनिक कोड) यामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षण प्रवास ट्रॅक केला जाणार आहे. सध्या राज्यात ८६% विद्यार्थ्यांचा डेटा संकलित झालेला असून ९५% आधार लिंकिंग पूर्ण झाले असल्याचेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

मंत्री भुसे म्हणाले की, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार, स्वच्छ शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालये, आणि खेळांची सुविधा यासाठी विशेष भर दिला जात आहे. आतापर्यंत 9 हजार उच्चशिक्षित शिक्षक नियुक्त झाले असून आणखी १० हजार भरती प्रक्रियेत आहेत.

मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले की, कोणतीही शाळा बंद होणार नाही आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पूर्ण व आनंददायी शिक्षण मिळावे, हे शासनाचे उद्दिष्ट आहे. या कामात सर्व जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले.

# राळेगाव तालुक्यातील वनोजा येथून पंढरपूरच्या जयघोषासाठी लालपरी बस रवाना

**संजय कारवटकर : यवतमाळ, ता. ४ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही राळेगाव बस आगारातून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरसाठी तालुक्यातील राळेगाव आगारातून दि.१ जुलै रोजी दुपारी १ वाजता वनोजा येथून ४५ विठ्ठलभक्त घेत पंढरपूर करिता राळेगाव आगाराची लालपरी रवाना झाली वनोजा ते पंढरपूर पूर्ण तिकीट ११५७ रू.असून महीलासाठी ५७९ रु.अर्ध तिकीट ठेवण्यात आले आहे, वनोजा येथून पंढरपुर ५७० किलोमीटर अंतरावर आहे. वास्तविक पाहता खरिपाची पेरणी आटोपल्यानंतर शहरासह ग्रामीण भागातील अनेक भाविक आषाढी एकादशीनिमित्त विठू माऊलीच्या दर्शनासाठी जात असतात.पेरणी करून पावसाची तमा न बाळगता ग्रामीण भागातील नागरिकांनी विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पंढरीला जाण्याची तयार केली आहे. राळेगाव तालुक्यातील वारकऱ्यांनी देखील भरभरुन प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात भर पडणार आहे.यावेळी वनोजा गावातील विठ्ठलभक्त भास्कर काचोळे, देवराव गुडधे, शालिक दांडेकर, दादाजी काटेकर,रमेश चिंचोणे यांच्यासह अनेक भाविक भक्तांसह उत्साहाच्या वातावरणात लालपरी बस पंढरपूरसाठी रवाना झाली.




# यूपीएससी, एमपीएससीसाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना बार्टीकडून अर्थसहाय्य

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** राज्यातील अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) युपीएससी आणि एमपीएससी परीक्षांसाठी विशेष अर्थसहाय्य योजना जाहीर केली आहे. सन २०२४ - २५ मध्ये होणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना एकरकमी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी १० हजार रुपयांचे एकरकमी अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

या योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२५ होती. तसेच जाहिरातीसह दिलेला अर्ज भरून ४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत टपालाद्वारे 'बार्टी', पुणे कार्यालयात पाठविणे बंधनकारक आहे.संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ साठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवारांना ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. अर्जाची प्रत बार्टीच्या वेबसाईटवरून डाऊनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह upscbartischeme@barti.in या ई-मेलवर पाठवावी. भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा २०२५ साठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीतील उमेदवारांनाही ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. अर्ज व आवश्यक कागदपत्रांची स्व-साक्षांकित प्रत स्कॅन करून १५ जुलै, २०२५ पूर्वी bartiupscforestengg@gmail.com या ई-मेलवर पाठवणे आवश्यक आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे, असे आवाहन बार्टीकडून करण्यात आली आहे. या योजनांबाबत अधिक माहिती बार्टीच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# धारेगावगावातील जुगार अड्ड्यावर धाड, २ लाख ६७ मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस प्रशासनाची संयुक्त कार्यवाही

**संजय कारवटकर : यवतमाळ, ता. ४ :** महागाव तालुक्यातील धारेगाव शिवारात सुरू असलेल्या फिरत्या जुगारावर स्थानिक गुन्हे शाखा व महागाव पोलिसांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत सहा जणांना अटक केली आहे. ही कारवाई काल (बुधवार) सायंकाळी पाचच्या सुमारास करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत – अविनाश ओंकार घुमर, देवानंद दत्ता धांडे, बंडू साहेबराव लोखंडे, व्ही. चव्हाण, राहुल नंदकुमार वानखेडे आणि भिकाजी राघोजी घाटमोरे.

महागाव पोलीस स्टेशन हद्दीतील धारेगाव शिवारात "बादशाह" नावाचा फिरता जुगार अवैधरित्या सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा आणि महागाव पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्त धाड टाकली.



धाडसत्रादरम्यान काही जुगारी पोलिसांना चकवा देत पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र सहा जणांना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची अंगझडती घेण्यात आली असून, त्यांच्याकडून एकूण २ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात २६ हजार रुपये रोख, तीन दुचाकी वाहनं आणि काही मोबाईल फोन यांचा समावेश आहे.

ही संयुक्त कारवाई महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार धनराज निळे, स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, मुन्ना आडे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पांडगळे आणि राजेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# घनकचरा व्यवस्थापनासाठी राज्यात लवकरच नवे धोरण : मंत्री उदय सामंत



**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** राज्यातील घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात ग्रामपंचायतींपासून ते मुंबई महानगरपालिकेपर्यंत वेगवेगळ्या स्वरूपाच्या अडचणी लक्षात घेऊन लवकरच व्यापक धोरण लागू करण्यात येईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य प्रज्ञा सातव यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. यावेळी सदस्य सर्वश्री शशिकांत शिंदे, निरंजन डावखरे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. मुंबईत दररोज सुमारे सात हजार मेट्रिक टन कचरा तयार होत असल्याचे सांगून मंत्री सामंत म्हणाले की, देवनार डम्पिंग ग्राउंडवरील १९३० पासून साचलेला कचरा हटवून ती जागा मोकळी करण्याचे काम सुरू असून, कांजूरमार्ग हा त्यासाठी पर्यायी उपाय ठरत आहे. ट्रान्सपोर्ट समस्या आणि कचरा रस्त्यावर पडण्याच्या तक्रारी सर्वच महापालिकांमध्ये आहेत. त्यामुळे नवीन धोरणात कचरा वाहतुकीच्या अडचणींचा देखील समावेश करण्यात येईल, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

मंत्री सामंत म्हणाले की, महालेखा नियंत्रकाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी केली जात असून, भविष्यात डम्पिंगऐवजी कचऱ्यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचाही विचार राज्य शासन करत असल्याचेही मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.



# समिती नको, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करा: वडेट्टीवार

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून चौथ्या दिवशीही विरोधकांनी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विधानसभा सभागृहात स्पष्ट शब्दांत सुनावले – "आपण निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना एकरकमी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्तेवर आल्यानंतर आपण तेच आश्वासन पायदळी तुडवत आहात. हे शेतकऱ्यांशी केलेले सरळसरळ फसवणूक आहे." असे सांगत वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी त्वरित जाहीर करण्याची मागणी केली.विरोधकांकडून कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'शेतकऱ्यांचा अपमान करणारे मंत्री राजीनामा द्या', 'सोयाबीन-तांदळाचे भाव द्या' अशा घोषणा सभागृहात दिल्या गेल्या.

## समिती नको, थेट कर्जमाफी करा

वडेट्टीवार म्हणाले की, सरकार आता कर्जमाफीसाठी समिती स्थापण्याचे सांगत आहे. मात्र शेतकऱ्यांना समिती नको आहे, त्यांना थेट कर्जमाफी हवी आहे. निवडणुकीपूर्वी महायुतीने जे वचन दिले होते, त्यानुसार तात्काळ निर्णय घ्या. आज सोयाबीन आणि तांदळासाठी जे किमान हमीभावाचे आश्वासन दिले गेले होते, त्याचा देखील लाभ शेतकऱ्यांना मिळत नाही. राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करत आहेत.

## कृषिमंत्र्यांची संवेदनशून्यता

वडेट्टीवार यांनी टीका करताना सांगितले की, "कृषिमंत्र्यांना वाटते की कृषी विभाग म्हणजे उजाड गावाची चौकीदारी आहे. त्यातूनच त्यांच्या संवेदनशून्यतेचा प्रत्यय येतो." शेतकऱ्यांच्या अपमानास कारणीभूत असलेल्या कृषिमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

## निवडणुकीपूर्वी आणि नंतर तफावत

वडेट्टीवार म्हणाले, "निवडणुकीपूर्वी राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कोरडवाहू पिकांसाठी १३,५०० रुपये, फळबागांसाठी २७,००० रुपये आणि बागायती पिकांसाठी ३६,००० रुपये मदत जाहीर झाली होती, आणि ३ हेक्टर पर्यंत मर्यादा होती. पण सत्तेवर आल्यानंतर ती मदत कमी करून अनुक्रमे ८,५००, १७,००० आणि २२,००० रुपये केली गेली. तसेच ३ हेक्टरची मर्यादा आता फक्त २ हेक्टरवर आणली गेली."

## कर्जमाफी, शेतकऱ्यांसाठी का नाही?

"शासन विविध प्रकल्पांसाठी पैसे उपलब्ध करून देते. उद्योगपतींचे कर्ज माफ केले जाते. पण शेतकऱ्यांना मदत करताना सरकारचे हात-पाय का बांधले जातात?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## शक्तीपीठ महामार्गाचा विरोध

वडेट्टीवार यांनी सांगितले की, "विरोधक शक्तीपीठ महामार्गाला विरोध करत आहेत, असा आरोप केला जात आहे. पण शेतकऱ्यांना महामार्ग नको आहे. त्यांची सुपीक जमीन गेली तर उपजीविकेवर परिणाम होणार. त्यामुळे विरोधक शेतकऱ्यांचा आवाज उठवत आहेत."

## पिक विम्यावर देखील सवाल

वडेट्टीवार यांनी पिक विमा योजनांवर देखील गंभीर आरोप केले. "शेतकऱ्यांना सोयाबीन, कापसाचे योग्य भाव मिळाले नाहीत. पेरणी करताना जो खर्च होतो, त्याचा मोबदला मिळालेला नाही. पिकविमा कंपन्यांनीही फसवणूक केली आहे. शेतकऱ्यांनी पैसे भरले, पण विम्याचा लाभ मिळालेला नाही. कृषी जमिनीचे दाखले दाखवून कोणी अधिकारी पैसे घेतले का? याची सखोल चौकशी व्हावी," अशी मागणीही त्यांनी केली.



# दिव्यांगांच्या मागण्यांवर निर्णायक तोडगा

■ महसूलमंत्री बावनकुळे यांच्या मध्यस्थीमुळे सहा मंत्र्यांची यशस्वी बैठक

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** राज्यभरातील विविध सामाजिक घटकांच्या मागण्या मान्य करण्यात यश आले असून, दिव्यांग, शेतकरी, मच्छीमार, ग्रामपंचायत कर्मचारी आणि शेतमजूर यांच्यासाठी निर्णायक निर्णय घेण्यात आले. हे सर्व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मध्यस्थीमुळे शक्य झाले. प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर विधानभवनात आयोजित उच्चस्तरीय बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीला कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आणि रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी स्वतंत्र बजेट व नियमशिथिलता

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांनुसार दिव्यांगांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद केली जाणार आहे. महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केलं की, साहित्य वितरण करताना उत्पन्न मर्यादा लागू न करता स्थानिक आमदारांच्या शिफारशीवरून साहित्य वितरित करावे. रहिवासी पुराव्याकरिता घराचे दस्तऐवज मागवू नयेत, फक्त "रहिवास" पुरावा पुरेसा ठरेल.

## मच्छीमारांसाठी धोरणात्मक निर्णय

पर्स साईन व लेसर पद्धतीच्या मासेमारीवर मर्यादा, पिंजरा पद्धतीच्या मासेमारीसाठी भाडे फेरविचार, आणि स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देण्याबाबत सहमती.रोजगार हमी योजनेंतर्गत शेती आणि दुग्ध व्यवसायाशी संबंधित मजुरीसाठी निधी उपलब्ध करण्याची प्रक्रिया सुरू.शेतमजुरांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन होणार, सेंद्रिय खतांवर अनुदान देण्याच्या प्रस्तावालाही सकारात्मक प्रतिसाद. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी वेतन आणि आकृतीबंधाबाबत निर्णय घेतले जाणार असल्याचं आश्वासन दिलं. वसुलीची अट रद्द करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळात मांडण्यात येणार. सप्टेंबरपूर्वी ऊस दर न दिल्यास संबंधित साखर कारखान्यांना गाळप परवाना नाकारण्याचा निर्णय सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केला. गायी व म्हशीच्या दूधाला आधारभूत दर जाहीर केला जाणार आहे. दुग्धविकासासाठी मनरेगाच्या निधीचा वापर केला जाणार.

# मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेवर तत्काळ प्रशासक बसवा!

■ आमदार संदीप जोशी यांची मागणी

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** गुलशननगर येथील दि मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व कर्मशाळा येथील कर्मचारी समस्यांमुळे अडचणीत आहेत. संस्थाचालकांच्या धोरणामुळे शाळा कधीही बंद पडून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी येऊ शकते. त्यावर त्वरित उपाय म्हणून शाळेवर प्रशासक नेमण्यात यावा, अशी मागणी आमदार संदीप जोशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

यासंदर्भात आ. जोशी यांनी 12 जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून संबंधित शाळेतील समस्यांचा पाढाच वाचला आहे. मागील 10 ते 15 वर्षांपासून शाळेत 26 कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेच्या कारभारात अकार्यक्षमता, अपारदर्शकता तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांवर अन्यायाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नियमित मानधन, वेतन इत्यादींबाबत अनेक समस्या आहेत. संस्थेने काढलेले कर्ज फेडण्याकरिता संस्थाचालकांकडून कर्मचाऱ्यांना दरमहा एक हजार रुपयांची मागणी केली जाते. शाळेत 35 तर कर्मशाळेत 38 विद्यार्थी आहेत. मात्र संस्थाचालकांच्या धोरणामुळे शाळा कधीही बंद पडून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची पाळी येऊ शकते. या गंभीर बाबी लक्षात घेता संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्वरित प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणी आमदार जोशी यांनी पत्रातून केली आहे.या मागणीची



दखल घेत माजी शिक्षक आमदार व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी देखील ३० जून रोजी अपंग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे आणि आयुक्त प्रवीण पुरी यांना पत्र पाठवले. त्यांनीही संस्थेची परिस्थिती अत्यंत बिकट असून शिक्षक व कर्मचाऱ्यांवर दबाव टाकत धमकी देण्यात येत असल्याचे नमूद केले. त्यांनी देखील प्रशासकाची तात्काळ नियुक्ती करण्याची गरज अधोरेखित केली.दि मातोश्री शोभाताई भाकरे निवासी शाळेतील व्यवस्थापनाबाबत दीर्घकाळापासून अनेक तक्रारी असून, शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित ठिकाणी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी संबंधित पत्रांद्वारे करण्यात आली आहे.

# बूट चाटणाऱ्यांना आमच्यात पडू नका!

संजय राऊतांचा शिंदे गटावर सडेतोड हल्ला



५ जुलै बदल घडवणारा, ठाकरे बंधुंच्या मेळाव्याला विरोधकांची झोप उडवणार

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** 5 जुलै रोजी मुंबईत होणाऱ्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्रित मेळाव्याची झळ विरोधकांना बसू लागली आहे. त्यामुळेच शिंदे गटाचे नेते व माजी सहकारी बिथरलेत, असा आरोप करत खासदार संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केला. "तुम्ही बूट चाटायचं काम करा, आमच्यात पडू नका," अशा खरमरीत शब्दांत राऊतांनी टोला लगावला. आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संजय राऊत म्हणाले, "उद्या होणारा मेळावा केवळ एक राजकीय कार्यक्रम नाही, तर तो महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा वळण आणणारा क्षण ठरेल." शिवसेना (उद्धव गट) आणि मनसे या दोन बंधुंच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या मेळाव्याला काँग्रेस, राष्ट्रवादी, डावे पक्ष आणि इतर संघटनांचा पाठिंबा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

## महाजनांवर टीकेची झोड

राऊत यांनी शिंदे गटातील नेत्यांवर टीकास्त्र डागताना म्हटलं की, "आज जे आमचे माजी सहकारी टीका करत आहेत, ते फक्त भीतीपोटी बोलत आहेत. कारण आता दोन्ही ठाकरे एकत्र येत असल्याने त्यांच्या राजकीय अस्तित्वालाच धोका निर्माण झालाय." ते पुढे म्हणाले, "गिरीश महाजन हे गुंड टोळ्या चालवतात, यावरही गंभीर आरोप आहेत. अशा लोकांनी आम्हाला शिकवू नये."

## त्यांनी तिकडंच लक्ष द्यावं...

रामदास कदम, नारायण राणे यांच्यासह शिंदे गटातील नेत्यांवर टीका करताना राऊत म्हणाले, "कालपर्यंत जे उद्धव ठाकरे यांचे होते, ते आज मोदी, शाह आणि फडणवीस यांचे झालेत. तेव्हा त्यांनी तिकडंच लक्ष द्यावं. आमच्यात पडू नये." "तुमचं काम म्हणजे त्यांच्या बूट चाटणं आणि पुसणं, तेच करा. स्वाभिमानाच्या गोष्टी करू नका. शिवसेना-मनसेचं काय होणार याची चिंता करू नका, स्वतःचीच चिंता करा," अशा शब्दांत संजय राऊतांनी शिंदे गटाला उद्देशून फटकारलं.

# अंत्यविधीसाठी आला पण स्वतःचा जीव गमावला

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** स्मार्ट झालेला फोन आता जीवनाचा अविभाज्य घटक बनत आहे. या फोनवर बोलताना अनेकांना कशाचेच भान रहात नाही. अवती भवती सुरू असलेल्या गोष्टीकडेही लक्ष नसते. फोनवर बोलताना रस्ता ओलांडणारे अनेकजण आपण सर्वत्र पहातो. यातून अनेकदा अपघात घडतात आणि त्याची किंमत मोजावी लागते. असाच काहीसा प्रकार गुरुवारी नागपुरात घडला.

अंत्यविधीसाठी पुणे येथून नागपुरात आलेल्या एका तरुणाला फोनवर बोलण्याच्या नादात कशाचेच भान राहिले नाही. गाफीलपणे हा तरुण लिफ्टसाठी तयार केलेल्या खड्ड्यात पडून दगावला. सर्वश्री नगरातील एका निर्माणाधीन इमारतीत सुरू असलेल्या लिफ्टच्या खड्ड्यात ही घडना घडली. राजेश गोविंद जगताप असे या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. पुणे जिल्ह्यातल्या चिखली येथील गोकूळ सोसायटीत राहणारे राजेश हे दोन दिवसांपूर्वी नातेवाईकाच्या एका अंत्यविधीसाठी नागपूरात आले होते. ज्या इमारतीतल्या लिफ्टच्या खड्ड्यात पडून राजेश यांचा मृत्यू झाला त्याच इमारतीच्या शेजारी त्यांच्या भावाचे घर आहे.मंगळवारी रात्री राजेश ज्या लिफ्टच्या खड्ड्यात कोसळले ती इमारत शेजारी आहे. मंगळवारी रात्री राजेश यांना एक फोन आला. त्यावर बोलता बोलता राजेश घरातून बाहेर आले. बोलण्याच्या नादात ते शेजारच्या निर्माणाधीन इमारतीत गेले. तिथेही त्यांना बांधकाम सुरू असल्याचे भान नव्हते. गाफील असल्याने बोलता बोलता ते पहिल्या माळ्यावर गेले. इथेही त्यांना लिफ्टचा खड्डा दिसला नाही आणि तोल गेल्याने ते खडड्यात पडले. डोक्याच्या भारावर पडल्याने राजेश यांना मेडिकलमध्ये दाखल करण्यात आले.

# बार्टी 'मार्फत जेईई आणि नीटच्या प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरु

मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या शहरात दोनशे जागांकरिता प्रशिक्षण

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे.

बार्टीमार्फत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी JEE-100 व NEET-100 जागांकरिता प्रशिक्षण राबविण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी विद्यार्थी इयत्ता 11 (विज्ञान) शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याजवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा व अधिवास दाखला असावा. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न 8 लाखाच्या घरात असावे. विद्यार्थी दिव्यांग असल्यास 40 टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. जेईई (JEE) आणि नीट (NEET) प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नमुद केल्याप्रमाणे महिला 30 टक्के, दिव्यांग (PWD) 5 टक्के, अनाथ 1 टक्के, वंचित 5 टक्के जागा आरक्षित असतील. प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता 10 वीच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता निहाय उमेदवारांची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी 24 महिन्यांचा असणार आहे. प्रशिक्षण काळात 75 टक्के पेक्षा जास्त उपस्थिती राहिल्यास विद्यार्थ्यांना दरमहा रु. 6 हजार एवढे विद्यावेतन दिल्या जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रु. 5 हजार एवढी एकरकमी रक्कम अदा करण्यात येणार आहे. या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करायचा आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख 30 जुलै आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी https://cpetp.barti.in या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन महासंचालक बार्टी मार्फत करण्यात आले आहे



# नाशिकमधील 'उबाठा' च्या अनेक नेत्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश

■ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गणेश गीते यांचाही भाजपा प्रवेश ■ प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी केले स्वागत ■ भाजपमध्ये 'उबाठा'चा पाऊस, पवार गटाचे नेतेही सामील

नाशिक मधील उबाठाचे माजी नगरसेवक सचिन मराठे, प्रशांत दिवे, कमलेश बोडके तसेच उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख कन्नु ताजणे यांनी गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गणेश गीते यांनीही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. राहुल ढिकले, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, ज्येष्ठ नेते बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, सुधाकर बडगुजर मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी यावेळी उपस्थित होते.

# एकाचवेळी पाच शेळ्या फस्त

**नागपूर, प्रतिनिधी ता. ४ :** साहेब.. वाघ बिबट्याचा बंदोबस्त करा.. ते जमणार नसेल तर आमची व्यवस्था करा. आज पाच बकऱ्या खाल्ल्या, उद्या आणखी काही. सांगा साहेब..? आम्ही कसे जगायचे..? व्याघ्रप्रकल्पालगतच्या प्रत्येक गावाची हीच कथा आहे. बोर व्याघ्रप्रकल्पालगतच्या गावांमध्ये सध्या वाघ आणि बिबट्यांच्या वावराने गावकरी भयभीत झाले आहेत. म्हणूनच त्यांनी वनमंत्र्यांसह सर्व आमदार, खासदारांना वन्यप्राण्यांपासून बचावासाठी साकडे घातले. याच गावकऱ्यांनी त्यांच्याकडे पुनर्वसनाची सुद्धा मागणी केली आहे.

गुरुवारच्या पहाटे अंदाजे तीन वाजताच्या सुमारास नागपूर वनविभागाच्या वनपरिक्षेत्रात वाघाने शेतकऱ्याच्या गोठ्यातील तब्बल पाच बकऱ्या फस्त केल्या. हिंगणी बफर क्षेत्रातील खापा येथील शेतकरी गोविंद राठोड यांच्या गोठ्यात त्यांनी बकऱ्या बांधून ठेवल्या होत्या. पाचपैकी एक बकरी उचलून नेली, तर चार बकऱ्यांचा घटनास्थळीच फडशा पाडला. या घटनेमुळे गावकरी देखील भयभीत झाले आहेत. या घटनेची माहिती हिंगणी बफर वनपरिक्षेत्र अधिकारी शालिनी शिरपूरकर यांना मिळताच त्यांनी वनरक्षक नेवारे यांना घटनास्थळी पाठवून घटनेचा पंचनामा करण्याचे निर्देश दिले. नागपूर जिल्ह्यातील खापा धोतीवाडा हे दोन्ही गाव बोर व्याघ्रप्रकल्पाला लागून आहेत. व्याघ्र प्रकल्पात वाघ, बिबट, अस्वलांच्या संखेत वाढ होत आहे. ते आपले भक्ष्य शोधण्यासाठी बोर व्याघ्रप्रकल्पातून लगतच्या गावातील शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांना आपले भक्ष्य बनवत आहेत.

## साहेब; वाघ, बिबट्याची सोय लावा, नाहीतर...

## नित्याचाच झाला हा प्रकार



जोड व्यवसाय म्हणून शेतकरी व गोपालक गाई, शेळीपालन करतात. निसर्ग साथ देत नाही, सरकार नैसर्गिक आपत्तीची नुकसान भरपाई देत नाही. वाघ, बिबट्यांकडून जनावरांना भक्ष्य बनवले जाते. वनविभाग पंचनामे करतात, पण मोबदला फारच कमी मिळतो. त्यासाठी महिनोनमहिने प्रतिक्षा करावी लागते. त्यामुळे धोतीवाडा, खापा सरपंच निलिमा ढोरे, उपसरपंच रमेश चव्हाण यांनी वनमंत्र्यासह आमदार, खासदारांना साकडे घातले आहे.बोर व्याघ्रप्रकल्पालगतच्या हिंगणी बफर, कोंढाळी, कारंजा या तिन्ही वनपरिक्षेत्रालगतच्या गावांमधील शेतकरी, गोपालक, शेळीपालक यांचे संरक्षण करा. आमच्या गावाचे पुनर्वसन करा, हिंस्त्र प्राण्यांची व्यवस्था करा, अशी विनंती वनमंत्री गणेश नाईक, आमदार चरणसिंग ठाकूर, खासदार श्यामकुमार बर्वे, खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, आमदार सुमित वानखेडे यांना केली आहे.

# मुंबईत पोलीसच निघाले खंडणीखोर!

■ पानटपरी चालकाचे अपहरण करून उकळले

**मुंबई, प्रतिनिधी ता. ४ :** मुंबईतल्या अंधेरी परिसरातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे बनावट इन्स्पेक्टर असल्याचं भासवत दोन पोलिसांसह चार जणांनी एका पानटपरी चालकाचे अपहरण करून त्याच्याकडून तब्बल ४३,५०० रुपयांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी चारही आरोपींना अटक केली असून, त्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. ही घटना अंधेरी पश्चिमेतील एस. व्ही. रोड परिसरात घडली. मोहम्मद आरिफ खान हे गेल्या अनेक वर्षांपासून येथे पानटपरी चालवत होते. काही दिवसांपूर्वी दुपारी एक आलिशान आर्टिका कार त्यांच्या टपरीसमोर येऊन थांबली. त्यातून उतरलेल्या दोन जणांनी आपण अन्न व औषध प्रशासनात इन्स्पेक्टर असल्याचे सांगून आरिफला गुटखा विक्रीसाठी आरोपी ठरवले. त्यानंतर आरिफला जबरदस्तीने कारमध्ये बसवून दादरच्या दिशेने नेण्यात आले.

गाडीतून नेत असताना आरिफकडे चौघांनी पैसे मागितले. पैसे न दिल्यास एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आली. घाबरलेल्या आरिफकडून सुरुवातीला खिशातील दहा हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतर त्याच्या मित्राकडून ऑनलाइन ३०,००० रुपये मागवून घेतले. इतकंच नव्हे, तर पुन्हा आरिफची झडती घेऊन साडेतीन हजार रुपये उकळले. एकूण ४३,५०० रुपयांची खंडणी वसूल केल्यानंतर आरोपींनी आरिफला सोडून दिले. घरी परतल्यानंतर आरिफने घडलेली घटना आपल्या कुटुंबीय व मित्रांना सांगितली. त्यांच्या सल्ल्यानुसार त्याने डी. एन. नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


## शेती जमीन विक्रीसाठी उपलब्ध

**■ रामटेक – भंडारा रोड, वाकेश्वर फाटा जवळ, खात रोड**

४.५ एकर रोडटच शेती जमीन
हायवेपासून ८०० मीटर अंतरावर
डांबरी रस्त्यालगत, नदीजवळ
गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम संधी

**■ काटोल – सावरगाव रोड**

३.५ एकर सुपीक शेती जमीन
हायवेपासून फक्त १०० मीटर अंतरावर
डांबरी रस्त्यालगत मुख्य रस्त्यालगतची,
वाहनसुलभ जागा
शेती व गुंतवणुकीसाठी अत्यंत उपयुक्त

**संपर्क: 9860093576, 9730116555**